# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

मार्डी रोड, तपोवन जवळ, अमरावती ४४४ ६०२ मो.नं. ९९२२९३०१६६ दूरध्वनी क्र. ०७२१-२६६५९०३

क्र. संगाबाअवि/१२/**०८**/२०१८

दिनांक : ०७.०२.२०१८

प्रति,

प्राचार्य,
सर्व संबंधीत महाविद्यालय,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
**अमरावती.**

**विषय : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरूष) स्पर्धा २०१७-२०१८ रद्द झाल्याने प्रशिक्षण वर्ग रद्द करण्याबाबत..**

संदर्भ : १) लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, जालंधर यांच्याकडून दिनांक ०५.०२.२०१८ रोजी प्राप्त झालेला इमेल.
२) क्रीडा व शा.शि.मंडळाचे पत्र क्र. SGBAU-12/02/2018 दिनांक ०८.०१.२०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांतर्गत तथा संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरूष) स्पर्धेचे आयोजन दिनांक २४.०२.२०१८ ते २८.०२.२०१८ या कालावधीत लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, जालंधर येथे होणार असल्याचे संदर्भ क्र. २ मधील दिनांक ०८.०१.२०१८ चे पत्रानुसार कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने विद्यापीठाद्वारे सॉफ्टबॉल (पुरूष) संघाचा प्रशिक्षण वर्ग दिनांक १३.०२.२०१८ ते २२.०२.२०१८ या कालावधीत रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर, जि. अमरावती येथे आयोजित करण्यात आला होता. परंतु **आयोजक विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या संदर्भ क्र.१ मधील दिनांक ०५.०२.२०१८ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविल्यानुसार सॉफ्टबॉल (पुरूष) स्पर्धांचे आयोजन काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आल्याचे कळविले आहे.**

तरी आपणास विनंती करण्यात येते की, **रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर, जि. अमरावती येथे दिनांक १३.०२.२०१८ ते २२.०२.२०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला सॉफ्टबॉल (पुरूष) संघाचा प्रशिक्षण वर्ग रद्द करण्यात येत असून** त्याबाबतच्या सूचना सर्वसंबंधीत खेळाडूंना देण्यात याव्या व अखिल भारतीय विश्वविद्यालय, नवी दिल्ली यांच्याकडून नविन तारखा कळविण्यात आल्यानंतर प्रशिक्षण वर्गाचे आयोजनाबाबत आपणास कळविण्यात येईल.

आपला

(डॉ.अविनाश असनारे)
संचालक
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपी** : १) प्रा. सी.एस. इंगोले, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर, जि. अमरावती
२) डॉ. यु.व्ही. देशमुख, प्राचार्य, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती
३) प्राचार्य, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर, जि. अमरावती
४) प्राचार्य, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती
यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव सादर -